प्रकरण पाचवे

कराड नगरपालिका उत्पन्न व खर्च

प्रकरण पाचवे

नगरपालिका उत्पन्न व खर्च

प्राचीन काळापासून आजपर्यंत आर्थिक बाबीला अतिशय महत्वाचे स्थान आहे. जर आर्थिक बाजू भक्कम असेल तर प्रगती होवू शकते आणि म्हणून कोणत्याही देशाचा अगर शहराचा विकास जर घडवायचा असेल तर आर्थिक बाब महत्वाची मानली जाते. हीच गोष्ट नगरपालिकेलाही लागू पडते. जर नगरपालिका यांच्दारे अनेक कार्यक्रम राबवून लोकांना सुख सोई व सुविधा पुरविता येतात. कार्यक्षम परिणामकारक प्रशासन नगरपालिकेने हाती घेतलेले उपक्रम याची यशस्वीता ही नगरपालिकेला मिळणा-या उत्पन्नावर असते. तसेच उत्पन्नाची साधने वेगवेगळया मार्गाने आर्थिक उभारणी करुन नगरपालिकेची आर्थिक गरज पूर्ण करता येते. नगरपालिकेच्या आर्थिक बाबीचा अभ्यास नगरपालिकेतील रेकॉर्डवरुन आपणास करता येतो.

नगरपालिकेचा आर्थिक परिस्थिती अभ्यासताना आपल्याला जमा व खर्च या दोन्ही गोष्टीचा अभ्यास या प्रकरणामध्ये करायचा आहे.

सुरुवातीस आपणास नगरपालिका उत्पन्न बाबीचा अभ्यास करु-

उत्पन्न -

१८५५ साली कराड नगरपालिका स्थापना झाली त्या सालापासून १९९२ पर्यंत नगरपालिकेचा विकास झालेला दिसून येतो. १९९१ जनगणणेनुसार कराड शहराची लोकसंख्या ५६,७०५ आहे[१].

या वाढत्या लोकसंख्येला सुविधा पुरविणे गरजेचे होते. त्यासाठी कराड नगरपालिकेने ह्या गरजा भागविण्यासाठी आपल्या पालिकेचा वसूल वाढविला. सन

१८५५ ते १९९३ काळातील नगरपालिकेच्या उत्पन्नाचा अभ्यास केला तर याचे प्रमाण वाढतच गेलेले दिसते. ते पुढील प्रमाणे-

सन १८५५ ते १९९३ च्या दर दहा वर्षातील उत्पन्नाच्या वाढीचा तक्ता

तक्ता क्र. १

अ.नं.	सन	उत्पन्न
१.	१८५५-१८६५	१००७३३-९६-६२
२.	१८६६-१८७६	१२९६५५-७१-६१
३.	१८७६-१८८५	५४३३५५२-९७-५०
४.	१८८६-१८९६	१२३८२४-७४-४६
५.	१८९७-१९०६	११२४६४-५७-४१
६.	१९०७-१९१६	१५७१७१-६०-५८
७.	१९१७-१९२६	५०४८१२-८६-५०
८.	१९२७-१९३६	६६०६३३-६०-९७
९.	१९३७-१९४६	१४०८५६०-४७-३०
१०.	१९४६-१९५५	३४४७९०६
११.	१९५५-१९६५	१२२६२१-११०-८५
१२.	१९७५-१९८५	५३४४५४६१
१३.	१९८५-१९९३	७७१४८४५९

कराड नगरपालिकेच्या उत्पन्नाच्या बाबी खालील प्रमाणे सांगता येतील -

१. नगरपालिका दर व कर यापासून मिळणारे उत्पन्न

२. विशेष अधिनियमाखाली वसुली

३. करा व्यतिरिक्त नगरपालिकेच्या मालमत्ता आणि उपयोगिता यापासून मिळणारे उत्पन्न

४. अंशदाने

५. संकिर्ण

अ. नगरपालिका दर व कर यापासून मिळणारे उत्पन्न -

१. जकात	२. घरपट्टी

३. इतर कर यामध्ये -

१. जमिन व इमारत कर	२. पाणीपट्टी	३. दिवाबत्तीकर
४. करमणूक कर	५. जाहिरात कर	६. वाहन कर
७. पाण्यावरील कर	८. यात्रा कर	९. स्वच्छता कर
१०. जलनिःसारण कर	११. शिक्षण कर	१२. कोंडवाडे कर
१३. इतर कर		

जकात -

नगरपालिका दर व कर यामध्ये १ नंबरचे महत्वाचे उत्पन्न म्हणजे जकात करापासून मिळणारे होय. नगरपालिकेची स्थापना १८५५ साली झाली व तिची प्रगती होण्यासाठी नगरपालिकेने स्थापनेबरोबर जकात कर वसूल करण्याचा अधिकार नगरपालिकेस मिळाला ते वसूल करण्याचा मक्ता लिलावाने दिला जात असे. जकातीचा रिवाजपट (दर) १८५५ रोजी मंजूर झाला. त्या पासून नगरपालिकेस वर्षाकाठी हजार पंधराशे रु. उत्पन्न येई. मक्त्याची पध्दत नगरपालिकेने सन १९७८-७९ सालापासून बंद केली व जकात वसुलास सुरुवात केली नि त्यासाठी रहदारीच्या मार्गावर जागोजाग नाकी बसवली. १९०९ साली जकात रिफंडाचे नियम लागू करण्याबद्दल सरकारी सूचना आल्यावरुन त्या ४-१०-१९०९ रोजी जकात

कमेटीने ठराव करुन जकात रिफंडाच्या नियमामुळे जकातीचे उत्पन्न नि ते वसुलीचा खर्च सारखाच होणार या सबबीवर जकात रद्द करुन नाकी उठवली. परंतु सरकारी सक्तीमुळे ता. २४-४-१९१० पासून नगरपालिकेस पुन्हा जकात वसुलीस सुरुवात करावी लागली. १९१० सालापासून कापड वगैरे मालाची आयात वाढत्या प्रमाणावर होऊ लागल्याने नगरपालिकेचे जकातीचे उत्पन्नही वाढू लागले. जकातीच्या उत्पन्नाची विशेष वाढ १९४१ सालापासून झाली. कारण त्या साली जकातीच्या रिवाज पटात व्यापक प्रमाणात आवक विशेष प्रमाणात वाढली. १९५१ साला पर्यंत आयात होणा-या जिनसाच्या वजनावर जकात आकारली जात असे, त्याऐवजी ता. १-३-१९५१ पासून नगरपालिकेने जिनसाच्या किंमतीवर जकातीची आकारणी सुरु केली. नित्योपयोगी वस्तूवरील जकातीचे प्रमाण त्या वस्तूच्या किंमतीवर शेकडा १.९० असून चैनीच्या वस्तू वरील जकातीचे प्रमाण दुप्पट आहे. जकात वसुलीसाठी नगरपालिकेने रहदारीच्या मार्गावर तीन प्रमुख नाकी, तळे नाके, कोयना पूल व कृष्णा पूल नाके, शिवाय कचेरी, कार्वे रस्ता, मोटार स्टँड अशी एकूण नऊ नाकी बसविली. २३-४-१९५४ पासून आयात होणारे हातमागाचे कापड नि हातमागाकरिता येणारे सूत यावरील सर्व जकात रिफंड देण्यास सुरुवात केली. नगरपालिकेच्या हद्दीत वापर होणा-या जिनसावर जकात फक्त नगरपालिकेस मिळत, इतर वाहतुकीच्या मालावरही अल्प प्रमाणात जकात नगरपालिकेस मिळावी असा ठराव नगरपालिकेने १९५५ रोजी सरकारकडे केला. तसेच सरकारी सुचनेवरुन शेंग, गुळ, हळद या मालावर नगरपालिकेने दर बैलगाडीस सहा आणेप्रमाणे जकात घेण्याचा निर्णय घेतला. हळूहळू नगरपालिकेच्या जकातीचे उत्पन्न वाढत गेल्याचे दिसते. १९७८ पासून डिझेल, पेट्रोल वगैरे किंमतीवर जकात आकारणी सुरु झाली.

खालील तक्त्यावरुन जकातीच्या उत्पन्नाची कल्पना येते'.

तक्ता क्र.२

अ.नं.	वर्षे	जकातीचे उत्पन्न
१.	१९५२-५३	१,९७,२०६
२.	१९५४-५५	२,३९,११२
३.	१९७२-७३	१२,३२,०५४
४.	१९७६-७७	२१,५९,३२०
५.	१९८२-८३	३८,५१,३३१
६.	१९८६-८७	६०,००,०००
७.	१९९०-९१	९४,८०,३५२
८.	१९९२-९३	१,२४,१००,४३

वरील तक्त्याचा अभ्यास केल्यावर असे दिसून येते की १९५२-५३ सालापासून जकातीचे प्रामण वाढतच गेल्याचे दिसते.

घरपट्टी -

नगरपालिकेच्या उत्पन्नाच्या साधनामध्ये घरपट्टीपासून मिळणारे उत्पन्नही महत्वाचे मानले जाते. पण नगरपालिकेची स्थापना झाल्यापासून पुढे १८७२ साली घरपट्टी आकारली. १८७० सालापर्यंत नागरिकावर कोणताही प्रत्यक्ष कर नगरपाकिलेने बसविलेला नव्हता. यावेळी मात्र कृष्णा कॅनॅलचे पाणी नळाने गावात आणणे ही शहर सुधारणेची मोठी योजना नगरपालिकेच्या पुढे असल्याने ती प्रत्यक्षात आणण्याकरिता नवीन कर बसवून उत्पन्न वाढविण्याची नगरपालिकेस जरुरी भासली. म्हणून ता. १८-५-१८६८ च्या जनरल सभेत शहरातील घरावर घरपट्टी बसविणेचा

निर्णय नगरपालिकेने घेतला आणि या निर्णयाची पूर्तता करणेचे सर्व अधिकार मॅनेजिंग कमेटीकडे सोपविले. घरपट्टी वसुली सोईचे व्हावे म्हणून मॅनेजिंग कमेटीने शहरातील पेठांच्या हद्दी निश्चित केल्या, घराची मोजदाद केली व प्रतवारी ठरविली. पहिल्या प्रतीच्या घरावर वार्षिक घरपट्टी ४ रु. दुसरी प्रत २ रु तिसरी प्रत १ रु., चवथी प्रत ८ आणे.

१९०९ साली पुढील प्रमाणे घरपट्टी वसुल केली जाई[४].

तक्ता क्र. ३

प्रत	किंमत रु. घरांची	वार्षिक घरपट्टी
१.	२५ ते ५०	०-८-०
२.	५१ ते १००	१-०-०
३.	१०१ ते ३००	१-८-०
४.	५०० ते ७००	४-८-०
५.	१००० ते १५००	८-०-०
६.	२००० ते ३०००	१२-०-०
७.	३००० ते ४०००	१२-०-०
८.	४००० ते पुढे	१६-०-०

लोकांच्या वाढत्या गरजा व महागाई या दोन्ही गोष्टींचा विचार करुन घरपट्टी दर पुढे वेळोवेळी वाढविलेल दिसतात. अतिशय अल्प २५ ते ५० रु. किंमतीच्या घरावर देखील ८ आणे या प्रमाणात घरपट्टी बसविलेली दिसते. म्हणजे कोणालाही घरपट्टी माफ केलेली नाही. सुरुवातीचा घरपट्टी आकारणी कालखंड आणि शेवटचा

कालखंड पाहिला असता त्यात सतत वाढ होत गेली असल्याचे आपल्याला पुढील तक्त्यावरुन दिसून येते'.

तक्ता क्र.४

अ.नं.	सन	घरपट्टीपासून मिळणारे उत्पन्न
१.	१९७२-७५	९,७७,४३६
२.	१९७६-१९७९	१५,८६,५६७
३.	१९८०-१९८३	२७,९५,९६२
४.	१९८४-१९८६	३९,१७,८५५
५.	१९८७-१९८९	३७,४५,५६०
६.	१९८९-१९९०	-
७.	१९९०-१९९३	१८,०६,२१९

सन १९०९ साली घरपट्टी वसुली ४००० रु. किंमती घराची वार्षिक घरपट्टी १६ रु. आकारली जात असे. त्यानंतरचा तपशील मिळत नाही. १९७२ ते १९९३ घरपट्टी आकारणीची आकडेवारी पाहता उत्पन्न बरेच वाढलेले दिसून येते.

पाणीपट्टी -

कराडच्या पश्चिम व उत्तर बाजूस लागून दोन मोठया कृष्णा, कोयना नद्या वाहतात. परंतु नद्यांची पात्रे खोल असल्याने शहराचा विस्तारही बराच मोठा असल्याकारणाने शहरातील पाणी पुरवठयाचा प्रश्न नगरपालिकेसमोर प्रथमपासून होता. १८६७ साली नगरपालिकेने कृष्णा कॅनॉलचे पाणी तलावाच्या नि खापरी नळाच्या

साहय्याने शहरात आणून ठिकठिकाणी बांधलेल्या १५ हौदात सोडले ही पालिकेची पाणी पुरवठयाची पहिली योजना होय.

त्यानंतर नगरपालिकेची पाणी पुरवठा योजना १९१८ साली पूर्ण होऊन शहरात पाणी पुरवठा सुरु झाला. या योजनेसाठी नगरपाकिलेने सरकारकडून बरीच मोठी रक्कम कर्जाऊ घेतली. कर्जाची फेड करण्याकरिता व पाणी पुरवठयाच्या कामी येणारा वार्षिक खर्च भागविण्याकरिता नगरपालिकेने मे. कमिशनर साहेबांच्या मंजुरीने सन १९१८-१९ सालापासून पाणीपट्टी बसवली.

सुरुवातीस बसविलेल्या पाणीपट्टीचे दर खालील प्रमाणे -

अ. खाजगी पाणीपट्टी वार्षिक -

	कनेक्शन	घरगुती	बिगर घरगुती
१.	अर्धा इंच	२४ रु.	५० रु.
२.	पाऊण इंच	४८ रु.	१०० रु.
३.	एक इंच	९६ रु.	२०० रु.

ब. सार्वजनिक पाणीपट्टी वार्षिक -

१. एक रुपया घरपट्टी असलेल्या घरास - ४ रु.

२. दोन रुपये घरपट्टी असलेल्या घरास - ६ रु.

३. तीन रुपये घरपट्टी असलेल्या घरास - १२ रु.

४. चार रुपये घरपट्टी असलेल्या घरास - १५ रु.

५. घरपट्टी माफ असलेल्या घरात वस्ती असलेस - १ रु.

क. पाणीपट्टी माफीस पात्र इमारती -

१. पब्लिक अर्थॉरिटीची ऑफिसे व इमारती

२. निव्वळ धार्मिक अगर धर्मार्थ उपयोगाच्या आणि कायम वस्ती अगर कसलेही उत्पन्न येत नसलेल्या इमारती.

१९४८ सालच्या पाणी पुरवठा सुधारणा योजनेनुसार मोटर्स बसविली १९५४ पासून मीटर पध्दतीने पाणी पुरवठा सुरु केला. खाजगी नळांना एक हजार गॅलनला घरगुती वापरासाठी नऊ आणे नि बिगर घरगुती कारणासाठी बारा आणे प्रमाणे आकारणी केली. १९५४-५५ सालच्या मीटर रीडींगवरुन एका वर्षात साडेसात कोटी गॅलन पाणी खाजगी नळावर वापरले गेले त्याची आकारणी सत्तावन्न हजार रु. झाली.

तसेच १९५४-५५ साली पाणीपुरवठा कडील जमा रु. ७९,५३९ व खर्च रु. ८६,८८५ झाला. वरील जमाखर्चाचे आकडे पहाता सरकारने आपला पाण्याच्या विक्रीचा दर कमी केल्याखेरीज नगरपालिकेस स्वतःचे पाणी पुरवठयाचे दर कमी करता येण्यासारखी परिस्थिती नाही[६].

१९७१-७२ साली नगरपालिकेस नागरिकांना नळाव्दारे पुरवित असलेल्या पाणी दर उत्पन्न फारच कमी असून नगरपालिकेस एकूण पाणी वितरण व्यवस्था चालविण्यास दरवर्षी ८ लाख इतका तोटा सहन करावा लागला. त्यासाठी पालिकेने वितरण व्यवस्था व वीज बीले भरुन काढणेसाठी पाणीपट्टीत वाढ केली[७].

सन १९९२ पासून कराड शहरास शुध्द स्वच्छ भरपूर पाणीपुरवठा केला. नव्या सुधारित योजनेची क्षमता १८ दशलक्ष लिटर्स असून पुढे ५० वर्षात कराड शहरास भरपूर पाणीपुरवठा उपलब्ध होईल या नवीन योजनेमुळे नगरपालिकेचे पाणीपट्टी वरील उत्पन्न वाढले[८].

सन १९७२ ते १९९३ पर्यंत पाणीपट्टीपासून मिळालेले उत्पन्न पुढील प्रमाणे

तक्ता क्र. ५

अ.नं.	सन	पाणीपट्टी
१.	१९७२-७३	१,६७,६७०
२.	१९७६-७७	२०,३७६
३.	१९८२-८३	२,८०,९२०
४.	१९८६-८७	११,००,०००
५.	१९९०-९१	११,२६,१९४
६.	१९९२-९३	१०,९४,२२०

सन १९७१-७२ साली नगरपालिकेस एकूण ८ लाख इतका तोटा सहन करावा लागला. तेव्हा पाणीपट्टी वाढ केल्याने उत्पन्न वाढले. पण पुढे १९९२-९३ साली थोडया प्रमाणात कमी झालेले दिसते.

वाहन कर/चाकपट्टी -

म्युनिसिपल हद्दीत असणा-या व येणा-या वहानावर चाकपट्टी आणि दस्तुरी घेण्याचा ठराव नगरपालिकेने ता. ४-११-१९०९ रोजी करुन सरकारी मंजुरीस पाठविला होता. त्या ठरावाला ता. १७-१२-१९१४ च्या पत्राने मे. कमिशनर यांनी मंजुरी दिली व १-४-१९५४ पासून वहानावर पुढील प्रमाणे चाकपट्टी बसविली.

म्युनिसिपल हद्दीत असणारी वाहने - दर वर्षास

१. मोटारगाडी - ८ रु.

२. चार चाकी दोन घोडयाची- ४ रु.

३. बैलगाडी - २रु.

४. सायकल/मोटार - ३ रु.

दस्तुरी कर - म्युनिसिपल हद्दीत येणारी वाहने -

१. मोटारगाडी - ४ आणे

२. घोडा किंवा बैलगाडी - २ आणे

३. सायकल - १ आणा

सरकारी व म्युनिसिपल सामान नेणारी वाहने यांना सारा माफी केली जाते[१०].

करमणूक कर -

दि बॉम्बे म्युनिसिपल बरोज ॲक्ट १९२५ चे कलम ५८ (जे) व ६१ (१) या प्रमाणे कोणत्याही नगरपालिकेला करमणुक कर घेणेचा अधिकार आहे.[११]

खालील तक्ता कराड नगरपालिकेला करमणुक करापासून मिळणारे उत्पन्न दर्शविते.

तक्ता क्र. ६

अ.नं.	सन	करमणूक करापासून मिळणारे उत्पन्न
१.	१९७२-७३	२०,८७५
२.	१९७३-७४	२०,४४०
३.	१९७४-७५	२०,६१५
४.	१९७५०७६	२१,०००
५.	१९७६-७७	२१,५९,३२०
६.	१९७७-७८	२३,००,०००
७.	१९७८-७९	१८,१३५
८.	१९७९-८०	२१,०००
९.	१९८०-८१	२२,३००
१०.	१९८१-८२	४२,५४०
११.	१९८३-८४	४४,९४०
१२.	१९८५-८६	४४,६००
१३.	१९८६-८७	८०,०००
१४.	१९९०-९१	४५,०८०
१५.	१९९२-९३	३५,४९०

याशिवाय नगरपालिका जमेच्या बाजूमध्ये दर व कर यामध्ये सर्वसाधारण कर, दिवाबत्ती कर, जाहिरात कर, स्वच्छता कर, जलनि:सारण कर, यात्राकर, कोंडवाडे इ. करांव्दारे नगरपालिकेस उत्पन्न मिळते. कराड नगरपालिकेला सर्व करापासून खालील प्रमाणे एकूण उत्पन्न मिळते[११].

तक्ता क्र. ७

अ.नं.	सन	सर्व करापासून मिळणारे एकूण उत्पन्न
१.	१८५५	१,१७०
२.	१८८५-८६	६,११९
३.	१९५४-५५	३,९८,८०९
४.	१९५९-६०	५,४५,९५०
५.	१९६२-६३	७,४७,०६०
६.	१९६५-६६	१०,९७,१२०
७.	१९६८-६९	१३,६२,०३०
८.	१९७०-७१	१७,०८,८००
९.	१९७४-७५	२१,१५,२२२
१०.	१९८०-८१	४८,७४,२००
११.	१९८५-८६	८०,६२,६२०
१२.	१९९०-९१	१,३८,१४,४६४
१३.	१९९२-९३	१,६९,७६,००५

ब. विशेष अधिनियमाखाली वसुली -

नगरपालिकेचे दुसरे उत्पन्न म्हणजे नगरपालिकेस दिलेल्या अधिकारापासून मिळणारे उत्पन्न होय. यात शॉप ॲक्ट, अन्नभेसळ प्रतिबंधक कायद्याखालील लायसेन्स फी, टाऊन प्लॅनिंग वर्गणी, हातगाडे लायसेन्स फी व विकास निधी या सर्व बाबीपासून नगरपालिकेस उत्पन्न मिळते.

करा‍ड नगरपालिकेस विशेष अधिनियमाखाली वसुलीस पुढील प्रमाणे उत्पन्न मिळते''.

तक्ता क्र. ८

अ.नं.	सन	विशेष अधिनियमाखाली वसुली
१.	१८५५	७०
२.	१८८५-८६	११७
३.	१९५४-५५	८,७६३
४.	१९५९-६०	३३,०५०
५.	१९६२-६३	६,४०५
६.	१९६५-६६	६४,७००
७.	१९६८-६९	५४,२९५
८.	१९७२-७३	४६,५५१
९.	१९७४-७५	३३,७९१
१०.	१९८०-८१	१,०६,३५०
११.	१९८५-८६	४३,०००
१२.	१९९०-९१	४६,५२५
१३.	१९९२-९३	१,९१,९१८

वरील आकडेवारीवरुन नगरपालिकेला विशेष कायद्याखालील उत्पन्न याची माहिती मिळते.

क. कराव्यतिरिक्त नगरपालिकेच्या मालमत्ता आणि उपयोगिता या पासून मिळणारे उत्पन्न -

कराड नगरपालिका उत्पन्नात नगरपालिकेच्या मालकीच्या साधन संपत्ती व अधिकारापासून मिळणा-या उत्पन्नाची भर पडली आहे. यामध्ये साधारणतः पुढील बाबींचा समावेश होतो.

१. मोकळी जागा व इमारत भाडे

२. जागा खरेदी विक्री पासून मिळणारे भाडे

३. नगरपालिका दवाखाना यापासून मिळणारे उत्पन्न

४. नगरपालिका हद्दीत व्यापार करणा-या व्यापा-यांच्याकडून व्यवसाय कर वॉरंट फी, नोटीस फी.

५. नगरपालिका कत्तलखान्यात कत्तलीसाठी आणलेल्या प्राण्यांवर फी

६. इतर बाबी - अतिक्रमण, फुटबोर्ड व पाय-या भाडे, लायब्ररी वर्गणी, काटा भाडे , शीत कपाट भाडे.

७. बाजार व गोडाऊन यांचे पासून मिळणारे उत्पन्न या सर्व बाबींचा समावेश होतो.

मोकळी जागा व इमारत भाडे -

नगरपालिकेला या प्रकारातून मिळणा-या भाडयामध्ये खालील गोष्टींचा समावेश होतो-

इमारत भाडयामध्ये - भाजी मार्केट, शॉपिंग सेंटर भाडे, मटण व फिश मार्केट भाडे, शामियाना भाडे यांचा समावेश होतो.

इमारत व जागा भाडेपासून मिळणारे उत्पन्न खालील प्रमाणे

तक्ता क्र. ९

अ.नं.	सन	जागा भाडे	इमारत भाडे
१.	१९७५	७४३	६२,९५०
२.	१९८०	३००	२,४२,०००
३.	१९८५	१०,०००	५,३५,५००
४.	१९९०	७,८३६	४,४४,९२४
५.	१९९३	१७,८१७	७,३३,०२५

शिक्षण संस्था -

यापासून मिळणा-या उत्पन्नामध्ये मॉन्टेसरी वाहन फी, मॉटेसरी प्रवेश फी व मॉन्टेसरी स्कूल फी यांचा समावेश होतो.

तसेच कराड नगरपालिकेस यशवंतराव चव्हाण स्मृतिसदन नाटयगृह भाडे मिळते. १९९३ साली १,३७,७४८ रु. उत्पन्न यापासून नगरपालिकेस मिळाले[१३].

सन १८५५ ते १९९३ अखेर कराव्यतिरिक्त नगरपालिकेच्या मालमत्ता आणि उपयोगिता यापासून मिळणारे एकूण उत्पन्न पुढील तक्त्यावरुन पहावयास मिळते[१५].

तक्ता क्र.१०

अ.नं.	सन	विशेष अधिनियमाखाली वसुली
१.	१९५५-५६	-
२.	१८८५-८६	१,४९८
३.	१९५४-५५	३८,००५
४.	१९५९-६०	९९,६२१
५.	१९६२-६३	५९,७७५
६.	१९६५-६६	९२,८६०
७.	१९६८-६९	५३,८५५
८.	१९७२-७३	१,०७,५५२
९.	१९७४-७५	१,०५,७१५
१०.	१९८०-८१	३,७९,३००
११.	१९८५-८६	३,८१,९८४
१२.	१९९०-९१	११,२९,८४३
१३.	१९९२-९३	१२,५८,३५६

वरील आकडेवारीवरुन नगरपालिकेला मालमत्ता आणि उपयोगिता यापासून मिळणा-या उत्पन्नाची पूर्ण माहिती मिळते.

अंशदाने/देणग्या व वर्गण्या यापासून मिळणारे उत्पन्न -

कराड नगरपालिका उत्पन्नाच्या साधनामध्ये देणग्या व वर्गण्या ही एक अत्यंत महत्वाची बाब आहे. हे उत्पन्न सरकारकडून नगरपालिकेला दिले जाते. कराड नगरपालिकेला खालील गोष्टीसाठी देणग्या व वर्गण्या मिळत होती.

१. विशेष मार्ग अनुदान

२. कुटुंब नियोजन

३. प्राथमिक शिक्षण अनुदान

४. विकास योजना नगररचना अनुदान कर्ज

५. महागाईभत्ता अनुदान

६. समान सवर्गाच्या पदाचे वेतनभत्ते

७. आरोग्य

८. अग्निशामक पथक

९. रस्ते बांधणे व त्याचे परिक्षण

१०. साथीचे रोग

११. बेवारशी प्रेते

१२. १. अ. टोल ग्रँट

ब. १५% लॅंड रेव्हेन्यू व ७५% नॉन ॲग्रिअसिसमेंट ग्रँट

क. शॉप एस्टॅब्लिशमेंट

ड. व्हाय स्टॅटिस्टिकल क्लार्क पगार अनुदान

इ. मॅजेस्टेरियल फाईन्स ग्रँट

फ. शिक्षण कर रिबेट ग्रँट

२. लायब्ररी अनुदान

३. प्रा. शाळा इमारती बांधणे अनुदान

४. प्रा. शाळा इमारती बांधणे अर्ज

५. टाऊन हॉल लायब्ररी हॉल अनुदान

६. सॅनिटरी इन्स्पेक्टर्स पे सबसिडी

७. स्टेडियम विस्तार व सुधारणा अनुदान

८. पब्लीक कन्व्हेनिअन्स फंड

९. झाडे लावणे अनुदान

१०. कॉलरा साथ अनुदान खर्च

इ. नालीविषयीचे उत्पन्न नगरपालिकेस मिळते.

सन १८५५ ते १९९३ अखेर नगरपालिकेस देणग्या व वर्गणी यापासून मिळणारे उत्पन्न दर्शविणारा तक्ता [१५].

तक्ता क्र. ११

अ.नं.	सन	देणग्या व वर्गण्या उत्पन्न
१.	१८५५	३५०
२.	१८८५	८
३.	१९५४-५५	६५,४६२
४.	१९५९-६०	३,०८,७२८
५.	१९६२-६३	१,२९,२०१
६.	१९६५-६६	५,१९,३९०
७.	१९६८-६९	२,८७,४५९
८.	१९७२-७३	३,८०,२५६
९.	१९७४-७५	५,०२,३९१
१०.	१९८०-८१	३५,९७,४३८
११.	१९८५-८६	६८,५६,६८६
१२.	१९९०-९१	१,०२,१९,३४४
१३.	१९९२-९३	१,३६,५२,५३४

इतर मार्गांनी मिळणारे उत्पन्न -

कराड नगरपालिकेला इतर मार्गांनी मिळणा-या उत्पन्नामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो.

१. नगरपालिका गुंतवणुकीवरील व्याज

२. साफसफाई कामाबद्दल मिळावयाच्या रक्कमा

३. प्रतिलिपी करण्याची फी

४. खाजगी व्यक्तिसाठी केलेल्या कामाबद्दलचा खर्च (साक्षी भत्ता)

५. खत विक्री

६. धर्मशाळापासून मिळालेल्या रक्कमा

७. जुन्या भांडाराच्या विक्रीचे उत्पन्न

८. म्युनिसिपल याद्या व फार्म विक्री फी

९. संकीर्ण विक्री

१०. आदेशिका फी आणि विधिविषयक खर्च

११. यात्रेकरु करनिधीमधून अंशदान

१२. ३% बांधकामावरील रिबेट

१३. इतर जमा रक्कमा

अ. खुर्च्या भाडे , रोड रोलर भाडे, म्युनिसिपल नोकर दंड, फोन कॉल, ऑडिट ऑब्जेक्शन, लप्स डिपॉझिट व जप्त डिपॉझिट

१४. अनपेड

१५. इतर किरकोळ

१६. ड्रेनेज कनेक्शन फी

१७. ड्रेनेजसाठी केलेल्या रस्ता दुरुस्ती चार्जेस

१८. ड्रेनेज लायसेन्स फी

सन १९५५ ते १९९३ या दर पाच वर्षातील नगरपालिकेला मिळणा-या इतर उत्पन्नाचा तक्ता पुढील प्रमाणे[१७].

तक्ता क्र . १२

अ.नं.	सन	नगरपालिका इतर उत्पन्ने
१.	१९५५	२,६६,१३१
२.	१९६०	१,३४,९९५
३.	१९६५	१,२४,७००
४.	१९७०	३,८९,२८७
५.	१९७५	९३,६२९
६.	१९८०	१,०४,४००
७.	१९८५	१२,२७,८००
८.	१९९०	१,१३,०८,५९४
९.	१९९३	१२,६२,२४५

वरील आकडेवारी कराड नगरपालिकेला इतर मार्गाने मिळणा-या उत्पन्नाविषयी माहिती दर्शविते. यात १९५५-२६६१३१ पासून वाढत जाऊन १९९३ साली ते १२६२२४५ पर्यंत गेले आहे.

वरील विवेचनावरुन असे स्पष्ट होते की सन १८५५ ते १९९३ या कालखंडात कराड नगरपालिकेचे उत्पन्न सतत वाढत गेलेले दिसून येते. जकात, पाणीपट्टी, घरपट्टी आणि इतर उत्पन्नाच्या साधनाचा अभ्यास केला तर ती साधने अधिक वाढत

जाऊन नगरपालिकेच्या उत्पन्नात भर टाकलेली दिसते. असे असले तरी ही फक्त एकच बाजू मानावी लागते. कारण नगरपालिकेने या मिळणा-या उत्पन्नाचा लोककल्याणासाठी कितपत चांगल्या पध्दतीने उपयोग करुन लोकांना अधिकाअधिक सोई पुरविल्या आहेत. यावर दुसरी बाजू अवलंबून असते. या दुस-या बाजूचा अभ्यास या प्रकरणातील दुस-या खर्च विभागात करणेत आला आहे.

कराड नगरपालिका खर्चाच्या बाबी -

नगरपालिकेला अनेक लोकोपयोगी कामे करावी लागतात ती खालील प्रमाणे

१. शहर स्वच्छ सुंदर ठेवणे आरोग्यदायी ठेवणे

२. रस्ते दुरुस्ती करणे व नवीन रस्ते बांधणे

३. दिवाबत्तीची सोय करणे

४. लोकांचे आरोग्याची काळजी घेणेसाठी दवाखाने चालविणे

५. शहरातील मुलांना व प्रौढांना शैक्षणिक सुविधा पुरविणे

६. शहरातील वाढत्या लोकसंख्येबरोबर वाढत्या समस्याचे निराकरण करणे आणि वाढत्या गरजा भागविण्याचे काम करावे लागते.

वरील कार्यक्रम नियोजनबध्द व पैसा उपलब्ध होईल तसे कार्यक्रम नगरपालिका पार पाडत असते. वरील पार्श्वभूमिवरती कराड नगरपालिकेने केलेल्या खर्चाचा आढावा घेणेचा प्रयत्न केला आहे.

कराड नगरपालिकेच्या खर्चाच्या मुख्य बाबी पुढीलप्रमाणे सांगता येतील-

१. सामान्य प्रशासन

२. सार्वजनिक सुरक्षितता

३. सार्वजनिक आरोग्य व शहर सफाई

४. शिक्षण

५. देणग्या व वर्गण्या

६. इतर

१. सामान्य प्रशासन -

या सदरामध्ये नगरपालिकेने केलेल्या खर्चात खालील बाबींचा समावेश करता येईल

१. कराड नगरपालिका नोकराचा पगार, प्रवास भत्ता, अलौन्स, घरभाडे इ.

२. निवृत्ती वेतन

३. प्रा. फंड ग्रॅच्युटी इ.

४. ऑफिस खर्च, करवसुल्या ऑक्ट्राय इतर कर वसुल्या आणि रिफंड करावयाची रक्कम इ.

सन १९५५ ते १९९३ नगरपालिकेने केलेला सामान्य प्रशासना वरील खर्च[१८]

तक्ता क्र.१३

अ.नं.	सन	सामान्य प्रशासनावरील खर्च
१.	१८५५	७२०
२.	१८६५	८३०
३.	१८७५	५४३
४.	१८८५	१,२०१
५.	१८९५	१,०८८
६.	१९०५	१,८१४
७.	१९१५	२,६८८
८.	१९२५	७,३०४
९.	१९३५	१०,४३१
१०.	१९४५	१८,६९३
११.	१९५५	६०,६४६
१२.	१९६५	१,७६,८३०
१३.	१९७५	५,८५,१९१
१४	१९८५	२४,२४,६८१
१५	१९९३	४६,३६,६१२

२. सार्वजनिक सुरक्षितता -

सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने नगरपालिकेमार्फत अनेक गोष्टींची पूर्तता करण्यासाठी खर्च केला जातो.सार्वजनिक सुरक्षितता मध्ये अग्निशाम स्थायी अस्थापन खर्च आकस्मिक खर्च साधन सामग्री व भांडारे खरेदी, रस्त्यावरील दिवाबत्ती, मोकाट

व पिसाळलेल्या कुत्र्यांचा नाश करणे इ. वरती खर्च करण्यात येतो. सन १९७१ ते १९९३ या काळातील नगरपालिकेने सार्वजनिक सुरक्षिततेवर पुढील प्रमाणे खर्च केला[११].

तक्ता क्र. १४

अ.नं.	सन	सार्वजनिक सुरक्षिततावर केलेला खर्च
१.	१९७०	१,४०,८७५
२.	१९७५	१,३५,८५२
३.	१९८०	२,४७,३५०
४.	१९८५	७,८९,१३७
५.	१९९०	१८,२९,४७९
६.	१९९३	२०,६९,७५९

वरील तक्त्यावरुन सार्वजनिक सुरक्षिततेवर झालेल्या वाढत्या खर्चाची कल्पना येते. वाढती लोकसंख्या व त्याच बरोबर वाढत्या शहराच्या गरजा भागविण्यासाठी वेळोवेळी खर्चात वाढ होत गेलेचे दिसून येते.

३. सार्वजनिक आरोग्य व शहर सफाई -

या बाबीमध्ये खालील गोष्टीचा समावेश होतो -

१. पाणीपुरवठा - नोकर पगार, महागाई भत्ता, घरभाडे इ. साहित्य खरेदी करणे. पाणी तपासणी फी, मोटर खरेदी दुरुस्ती केंद्रिय जल प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण उपकरणे खरेदी इ.

२. रस्ते साफसफाई

३. इस्पितळ व दवाखाने यांना लागणारा नोकर पगार, साधनसामग्री खरेदी, शववाहक गाडी खरेदी, अम्ब्युलन्स खरेदी व व्यवस्था, औषधे खरेदी

४. ड्रेनेज स्वच्छता व नवीन भुयारी गटर योजना तसेच संडास मुतारी स्वच्छ करणे

५. देवीची लस टोचणे - नोकरांचा पगार व प्रवास भत्ते अलौन्स तसेच छपाई व लसीची किंमत इ.

६. साथीचे रोग - मलेरिया औषध खरेदी, पिंजरे खरेदी, रोगजंतुनाशके खरेदी करणे.

७. प्रेतांची वसालत लावणे

८. मार्केट व कसाईखाना, कोंडवाड, जनावरे वैरण खरेदी, सार्वजनिक जागा खरेदी इ. खर्च केला जातो.

सन १८५५ ते १९९३ दशवार्षिक मध्ये नगरपालिकेने सार्वजनिक आरोग्य व शहर सफाई वरील खर्च खालील प्रमाणे[२०] -

तक्ता क्र. १५

अ.नं.	सन	सार्वजनिक आरोग्य व शहर सफाई यावर केलेला खर्च
१.	१८५५	-
२.	१८६५	१,७५८
३.	१८७५	१,८५३
४.	१८८५	१,७४१
५.	१८९५	६,४३८
६.	१९०५	३,७७५
७.	१९१५	५८,०७६
८.	१९२५	२२,४७९
९.	१९३५	३९,३८१
१०.	१९४५	९२,६८९
११.	१९५५	२,०८,४५१
१२.	१९६५	९,६५,२०५
१३.	१९७५	१६,०१,७४१
१४.	१९८५	७७,४५,५३२
१५.	१९९३	२०,६९,७५९

वरील आकडेवारीवरुन सार्वजनिक आरोग्य व शहर सफाई यावर नगरपालिकेने सन १८५५ ते १९९३ या कालखंडात केलेल्या खर्चाचा आढावा घेतला असता असे निदर्शनास येते की सन १८५५ सालचा सदर विषयावरील खर्च मिळत नसून १८६५ साली १७५८ रु. होता. जसजसी लोकसंख्या वाढत गेली शहराचा विस्तार वाढत

गेल्याने सार्वजनिक आरोग्य व शहरसफाई यावर केलेला खर्च वाढत गेलेला दिसतो. सन १९९३ साली तो २०६९७५९ रु. एवढा आहे. इतर खर्चाशी तुलना केली तर ह्या वर्षातील आकडेवारी खुपच जास्त आहे.

४. शिक्षण -

या विभागामध्ये शैक्षणिक संस्थांना दिलेल्या देणग्या तसेच नगरपालिकेने चालविलेल्या पूर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या शिक्षकांचा पगार व इतर भत्ते अलौन्स, शाळा इमारत बांधकाम, शाळा इमारत भाडे तसेच प्रशासकीय नोकर वर्ग मुलांना शाळेचा गणवेश, शैक्षणिक साहित्य खरेदी इ. गोष्टीचा समावेश होतो. खालील तक्त्यावरुन या विभागासाठी कराड नगरपालिकेने केलेल्या खर्चाची कल्पना येते.

सन १९५५ ते १९९३ अखेर कराड नगरपालिकेने शिक्षणावर केलेल्या खर्चाचा तपशील दाखविणारा तक्ता पुढील प्रमाणे -

तक्ता क्र.१६

अ.नं.	सन	शिक्षणावर केलेला खर्च
१.	१९५५	४३,२८३
२.	१९६०	४२,०६५
३.	१९६५	१,७१,०२०
४.	१९७०	१,५६,२५०
५.	१९७५	९५,२३२
६.	१९८०	१६,०६,५१५
७.	१९८५	३२,५१,५६२
८.	१९९०	५५,६२,११३
९.	१९९३	६९,९७,०६५

वरील तक्ता शिक्षणावर झालेल्या खर्चाचा तपशील दर्शवितो हा खर्व ४३२८३ पासून ते ६९९७०६५ पर्यंत वाढत गेलेचे दिसून येते. वेळोवेळी वाढत जाणारा शिक्षक वर्ग व मुलांच्या बसण्याची सोय होणेसाठी नवीन बांधलेले शाळा इमारत आणि शिक्षण मंडळाचा कर्मचारी वर्ग यामुळे हा वाढलेला खर्च दिसून येतो".

५. देणग्या/ अंशदाने खर्च -

या प्रकारच्या खर्चामध्ये नगरपालिकेला लॅंड रेव्हेन्यू लोकल सेल्फ गव्हर्नमेंट वर्गणी इतर अनुदाने भूकंपग्रस्त मदत निधी व इतर खर्च इ. बाबींवरती नगरपालिकेला खर्च करावा लागतो.

सन १८५५ ते १९९३ अखेर कराड नगरपालिकेने देणग्या यावरती केलेल्या खर्चाचा तपशील पुढील प्रमाणे"

तक्ता क्र.१७

अ.नं.	सन	देणग्यावर केलेला खर्च
१.	१८५५	११९
२.	१८६५	५९३
३.	१८७५	६०७
४.	१८८५	४११
५.	१८९५	१,३८९
६.	१९०५	५२४
७.	१९१५	३,२४०
८.	१९२५	३,२६९
९.	१९३५	६,७८४

अ.नं.	सन	देणग्यावर केलेला खर्च
१०.	१९४५	४,१८८
११.	१९५५	१,२०,९९५
१२.	१९६५	५१०
१३.	१९७५	३,०५,१७७
१४.	१९८५	२,७३,३२२
१५.	१९९३	१२,०८,१२७

६. इतर खर्च/संकीर्ण -

या प्रकारात निवडणुक खर्च खानेसुमारीचा खर्च, दावे खटल्यांचा खर्च, वॉटर सप्लाय स्कीम वरील कर्ज फेड, स्वातंत्र्य दिन व इतर उत्सव खर्च, सत्कार मानपत्र, मिटींग भत्ता, टंचाई निवार इत्यादी बाबींवर होणारा खर्च, गॅरंटी फी, बेवारस प्रेते, निवारण खर्च, महिला व बालकल्याण विकास चेकचे कमिशन व चेकतील फरक इ. बाबीवरती नगरपालिकेला खर्च करावा लागतो.

तक्ता क्र.१८

अ.नं.	सन	इतर गोष्टींवर केलेला खर्च
१.	१८५५	-
२.	१८६५	६,२३५
३.	१८७५	९,९६०
४.	१८८५	-
५.	१८९५	२२८
६.	१९०५	१,४०७
७.	१९१५	५,८४८

अ.नं.	सन	इतर गोष्टींवर केलेला खर्च
८.	१९२५	३६,४४५
९.	१९३५	५,५९९
१०.	१९४५	१२,६९६
११.	१९५५	१,५४,१९९
१२.	१९६५	३,१७,१६७
१३.	१९७५	५१०
१४.	१९८५	३,०५,१७
१५.	१९९३	२,७३,३२२
	एकूण	१२,०८,१२७

वरील तक्त्यावरुन नगरपालिकेने १८५५ ते १९९३ पर्यंत केलेल्या इतर खर्चाची कल्पना येते[२३].

नगरपालिकेचा १८५५ ते १९९३ अखेर पर्यंतचा एकूण खर्च -

१८५५ साली नगरपालिकेची स्थापना झाली. नगरपालिकेने आपल्या स्थापनेपासून अनेक लोकोपयोगी कामे केली. त्यासाठी नगरपालिकेने जो खर्च केला त्याचा एकूण खर्चाचा तपशील पुढील प्रमाणे[२४].

सन १८५५ ते १९९३ अखेर पर्यंतचा नगरपालिकेचा एकूण दशवार्षिक खर्च दर्शविणारा तक्ता -

तक्ता क्र.१९

अ.नं.	सन	एकूण खर्च
१.	१८५५-६५	१००७३३-९६-६२
२.	१८६६-७६	१२९६५५-७१-६१
३.	१८७६-१८८५	५४३३५५२-९७-५०
४.	१८८६-१८९६	१२३८२४-७४-४६
५.	१८९७-१९०६	११२४६४-५७-४१
६.	१९०७-१९१६	१५७१७१-६०-५८
७.	१९१७-१९२६	५०४८१२-८६-५०
८.	१९२७-१९३६	६६०६३३-६०-९७
९.	१९३७-१९४६	१४०८५६०-४७-३०
१०.	१९४६-१९५५	३४४७९०६
११.	१९५५-१९६५	१२२६२१-११०-८५
१२.	१९७५-१९८५	५३४४५४६१
१३.	१९८५-१९९३	७७१४८४५९

वरील तक्ता सन १८५५ ते १९९३ अखेर एकूण खर्च कसा वाढत गेला. या विषयीचे पूर्ण चित्र दर्शवितो. सन १८५५-६५ साली १००७३-९३-६२ इतका खर्च झाला होता तर १९८५-९३ मध्ये ७७१४८४५९ येवढा खर्च वाढलेला दिसते।.

वरील सर्व पृथकरणाचा अभ्यास केला तर आपणास असे म्हणता येईल की कराड नगरपालिकेच्या खर्चात सतत वाढ होत गेली आहे याचे कारण म्हणजे म्युनिसिपल नोकरवर्गाच्या पगारात वाढ होत गेली. गरजेप्रमाणे वेळोवेळी नवीन नोकर

भरती करणेत आली. तसेच नगरपालिकेने लोकसंख्यानुसार शहर विकासाची कामे हाती घेतली. तसेच लोकांना चांगल्या आरोग्य दायक सुविधा पुरविणेचा प्रयत्न केला. तसेच १८५५ ते १९९३ या दरम्यानच्या काळात बरीच लोकसंख्या वाढली घरांची संख्या वाढली, शाळा दवाखाने वाढवणे भाग पडले, पुन्हा नोकर वाढ आलीच. नवीन खात्याच्या स्थापनेत नगरपालिकेला बराच पैसा खर्च करावा लागला.

कराड नगरपालिकेने १९९३ मध्ये आपल्या एकूण ७७१४८४५९ खर्चापैकी सार्वजनिक आरोग्य खात्यावर १६५७१४५१ इतका खर्च केला. तसेच त्याच वर्षी शिक्षणावर ६९९७०६५ इतकी रक्कम खर्च केली आहे. या दोन्हीचा एकत्रीत विचार केला तर नगरपालिकेने या विभागावर आपल्या उत्पन्नाचा बराचसा भाग खर्च केला आहे. अशा रितीने कराड नगरपालिकेच्या उत्पन्नाच्या व खर्चाच्या बाबी आहेत.

अशारितीने कराड नगरपालिकेने वेगवेगळया बाबीपासून मिळणारे उत्पन्न, जकात कर व शासकीय अनुदान हे कराड नगरवासियांच्या, शैक्षणिक आरोग्य इत्यादी नागरी सुविधा पुरविणेसाठी पैसा खर्च केला. शहरातील रस्ते साफसफाई, बालवाडया पिण्याचे पाणी सोय इ. बाबींवर खर्च करुन इतर नगरपालिकेना एक आदर्श घालून दिला. सुदैवाने कराड नगरपालिकेचे उत्पन्नही चांगले होते व त्या उत्पन्नाचा विनियोग नगरपालिका प्रशासनाने नागरी सुविधा पुरविण्याकरिता केलेला दिसून येतो आणि ही बाब स्तुत्य व गौरवास्पद वाटते.

संदर्भ

१. ढवळे ना. वा. - दै. सकाळ लेख कात्रण, दि. २८ सप्टें. १९९२

२. पाटील पी. डी., संपादक - कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५ ते १९५५ पृ- २८,३४,४०,५५, ६७, ७४, ९९, १०० व जमाखर्चाचे अंदाजपत्रक १९७२ ते १९९३ ज. प्रो. बुक १९५५ ते १९७२.

३. कित्ता - पृ. ५१,६८,७४,८३,११०,१११.

४. कित्ता - पृ. ३४,५९,७५.

५. नगरपालिका रेकॉर्ड - जमाखर्च अंदाजपत्रक १९७२-१९९३

६. पाटील पी. डी. - संपादक कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ पृ- ३६,६९,७५,११४,११५

७. नगरपालिका रेकॉर्ड - ज.प्रो. बुक १९७१

८. कराड नगरपालिका रेकॉर्ड - मिटींग वृतांत १४ सप्टें. १९९३

९. कराड नगरपालिका रेकॉर्ड - जमाखर्च अंदाजपत्रक १९७२-१९९३

१०. पाटील पी. डी., संपादक- कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, पृ.६८

११. कराड नगरपालिका रेकॉर्ड - दि बॉम्बे म्युनिसिपल बरोज अॅक्ट, १९२५-५८, जे व ६१ (१)

१२. पाटील पी. डी., संपादक - कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५ ते १९५५ पृ. १४ व ज. प्रो. बुक १९५४ ते १९६९ व जमाखर्च अंदाजपत्रक १९७२-९३

१३. पाटील पी. डी., संपादक - कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५ ते १९५५ पृ. १४ व ज. प्रो. बुक १९६०, ६३, ६५, ६६, ६८, ६९ व जमाखर्च अंदाजपत्रक १९७२-९३.

१४. कराड नगरपालिका रेकॉर्ड - अंदाजपत्रक १९७५ ते १९९३

१५. पाटील पी. डी., संपादक - कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५ ते १९५५ ज.प्रो.बुक १९६९-६०, १९६२-६३, १९६८-६९, १९७२-७३, जमाखर्च अंदाजपत्रक १९७४ ते १९९३.

१६. पाटील पी. डी., संपादक- कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५ ते १९५५, ज.प्रो.बुक १९६९-६०, १९६२-६३, १९६८-६९, १९७२-७३ जमाखर्च अंदाजपत्रक १९७४ ते १९९३.

१७. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज.प्रो.बुक १९५५ ते १९९३

१८. पाटील पी. डी., संपादक - कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५ ते १९५५, ज.प्रो.बुक १९६५-७५, जमाखर्च अंदाजपत्रक १९७५ ते १९९३.

१९. कराड नगरपालिका रेकॉर्ड - १९७० ते १९९३

२०. पाटील पी. डी., संपादक - कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५ ते १९५५ पृ- १५ ज. प्रो. १५६५ ते १९७५ व जमाखर्च अंदाजपत्रक १९७५-१९९३.

२१. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज. प्रो. बुक १९५५ ते १९९३

२२. पाटील पी. डी. संपादक - कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ १८५५ ते १९५५, ज. प्रो. १९६५ ते १९७५ व जमाखर्च अंदाजपत्रक १९७५ ते १९९३.

२३. कित्ता - पृ. ९५, ज. प्रो. १९६५ ते १९७५ व जमाखर्च अंदाजपत्रक १९७५ ते १९९३.

२४. कित्ता - पृ. १००, ज.प्रो. १९६५ ते १९७५ व जमाखर्च अंदाजपत्रक १९७५ ते १९९३.